## प्रेस नोट

ता. १६/०९/२०१७

# पौड पोलीस स्टेशन चे ३ वर्षापूर्वीच्या खुनाच्या गुन्हयाची उकल करुन आरोपींना गुन्हे शाखा युनिट २ कडुन जेरबद

कोंढवा पोलीस स्टेशन गु र न ६१/२०१७ भा द वि क ३०२,२०१ मध्ये हगवणे नगर, स्काय पार्क बिल्डींगचे पाठीमागे मोकळया प्लॉटमध्ये एका महिलेची धारधार शस्त्राने वार करुन, डोक्यात दगड घालून जिवे ठार मारुन अर्धवट जळालेल्या स्थितीत डेड बॉडी मिळाली होती. त्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता सदरचा गुन्हा हा महिलेचा खून करुन त्याची ओळख पटु नये म्हणुन आरोपीने मयत महिलेचे अंगावर ज्वलंतशील प्रदार्थ टाकुन तिस पेटवुन दिल्याने पोलीसांसमोर एक मयताची ओळख पटवुन आरोपीचा शोध घेवुन त्यांना जेरबंद करण्याचे मोठे आवाहन होते त्याबाबत सखोल माहिती काढून गुन्हे शाखा समांतर तपास करीत असतांना गुन्हे शाखा युनिट २ मधील सहा पोलीस फौजदार उदय मोरे, पो हवा दिनेश गडांकुश यांना मिळालेल्या बातमीवरुन सदर गुन्हयातील संशयीत आरोपी नामे ऋषीकेश श्रीकांत गाडे वय २२ रा. बी-६५, खोली क्र. ७, व्ही आय टी कॉलेजचे मागे, अप्पर इंदिरा नगर पुणे यास ताब्यात घेवुन त्याचेकडे विचारपुस करता त्याने सदर गुन्हयाची कबुली देवुन सदरचा गुन्हा हा त्याने व त्याचा मित्र विकास उर्फ विकी नवनाथ जतार यांनी केल्याचे कबुल केले होते.

त्यावेळी सदर गुन्हयाचे चौकशी मध्ये आरोपीकडे सखोल तपास करीत असताना आरोपी नामे ऋषीकेश श्रीकांत गाडे याने सन २०१४ रोजी सुतारवाडी, पौड येथे त्याचे ओळखीचे १) अनिल वसंत सुतार, वय ३९, धंदा रिक्षा ड्रायव्हर, रा. बी/६४/२३ अपर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे २) अक्षय कैलास गरुड, वय १९, रा. बी/६४/२७ अपर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे यांचेसोबत जावून अनिल सुतार याचा भाऊ विकास वसंत सुतार, रा. सुतारवाडी, ता. मुळशी, पुणे हा त्याचे आईस दारुपिऊन त्रास देतो म्हणून त्यास लाथा बुक्याने व लाकडी दांडक्याने मारहाण करुन जिवे ठार मारल्याची माहिती सांगितली होती.

त्याप्रमाणे पौड पोलीस स्टेशन येथे सदर बाबत माहिती घेतली असता अ.मृ.र.नं. ५३/२०१४, भादवि कलम १७४ प्रमाणे अकस्मात मृत्यूची नोंद असल्याची निदर्शनास आले. त्यावेळी सदर अकस्मात मृत्यूची कागदपत्रे मिळणेबाबत पत्रव्यवहार केला असता सदर कागदपत्रे ही उप विभागीय अधिकारी मावळ-मुळशी विभाग यांचेकडे समरी मंजूरीकरीता पाठविण्यात आल्याचे कळविण्यात आले होते. त्याअन्वये उप विभागीय अधिकारी मावळ-मुळशी विभाग यांचे कार्यालयातून पौड पोलीस स्टेशन अ.मृ.र.नं ५३/२०१४, भादवि क. १७४ ची कागदपत्रे हस्तगत करुन अवलोकन केले असता सदर अकस्मात मृत्यूची खबर अनिल वसंत सुतार याने त्याचा भाऊ विकास वसंत सुतार हा आब्यांचे झाडावरुन पडल्याने मयत झाल्याबाबत खबर दिली होती व सदर मयताचे पोस्टमार्टम प्राथमिक आरोपी केंद्र पौड येथे झाले असून सदर पोस्टमार्टम नोट्स मध्ये आरोपीचे अंगावर ११ जखमा असल्याबाबत नमूद असून त्याचे कवटीचे हाड व उजव्या पायाचे हाड फ्रॅक्चर झाले असून छातीत, पोटात व मेंदूमध्ये रक्तस्त्राव झाल्याचे नमूद होते.

सदर वरील नमूद जखमा हया झाडावरुन पडल्यामुळे होण्याची शक्यता नसल्याने सदर बाबत संशयीत आरोपी नामे १) अनिल वसंत सुतार २) अक्षय कैलास गरुड यांना चौकशी कामी ताब्यात घेवून चौकशी केली असता अ.क्र. १ याला दि. ०९/०६/२०१४ रोजी त्याचे आईचा फोन आला की, विकास वसंत सुतार हा दारु पिऊन जास्त त्रास देत आहे. म्हणून तो, अक्षय कैलास गरुड व ऋषीकेश श्रीकांत गाडे असे तिघे मोटारसायकल वरुन त्याचे मूळगावी सुतारवाडी, ता. मुळशी या ठिकाणी जावून मयत नामे विकास वसंत सुतार हा घरामध्ये दारु पिऊन झोपला असताना त्यास घराबाहेर काढून लाकडी दांडक्याने व लाथाबुक्याने मारहाण करुन त्याचे हालचाल बंद झाल्यानंतर घरासमोरील झाडाखाली टाकून पुणे येथे परत आले होते व त्यानंतर दि. १०/०६/२०१४ रोजी अनिल वसंत सुतार याचे आईने त्याचा भाऊ विकास हा मयत झाल्याचे सांगितले म्हणून अनिल वसंत सुतार याने पौड पोलीस स्टेशनला जावून खोटी खबर

दिल्याचे कबुल केले आहे. त्यानंतर अकस्मात मृत्यू मधील पोस्टमार्टम नोट्स मा. अधीक्षक, न्याय सहायक विज्ञान, पुणे यांना रिपार्टाने सादर करुन पोस्टमार्टम मधील जखमा हया झाडावरुन पडून, तारेच्या कंपाऊंड वरुन पडून होवू शकतात किंवा मारहाणीमुळे होवू शकतात अशी विचारणा केली असता त्यांनी मयत विकास सुतार यास पोस्टमार्टम मध्ये नमूद असलेल्या जखमा हया By assault hard and blunt object ने झालेल्या असून सदरच्या जखमा हया झाडावरुन किंवा तारेच्या कंपाऊंड वरुन पडल्याने होण्याची शक्यता नाही असा स्पष्ट अभिप्राय दिलेला आहे.

अशा प्रकारे आरोपी नामे १) अनिल वसंत सुतार, वय ३९, धंदा रिक्षा ड्रायव्हर, रा. बी/६४/२३ अपर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे २) अक्षय कैलास गरुड, वय १९, रा. बी/६४/२७ अपर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे यांना ताब्यात घेवून सखोल चौकशी करुन सुमारे ३ वर्षापूर्वी त्यांनी व ऋषीकेश उर्फ हुक्क्या श्रीकांत गाडे वय २२ रा. बी ६५, खोली क्र. ७, व्हीआयटी कॉलेज मागे, अप्पर इंदिरानगर पुणे यांनी खुनाचा गुन्हा केल्याचे उघडकीस आणण्यात युनिट २ चे अधिकारी व कर्मचारी यांना यश आलेले आहे.

सदरची कामगिरी मा. श्री प्रदिप देशपांडे अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पोलीस उप आयुक्त, श्री पंकज डहाणे, सहा पोलीस आयुक्त, श्री सुरेश भोसले यांचे मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक सतिश निकम, सपोनि अन्सार शेख, पोहवा गडांकुश, पठाण, शेख, खराडे, पोना सावर्डे यांनी केलेली आहे.